<u>**फिर्यादीतर्फे सा. क्र. १ फिर्यादी स्वतः यांचा पुढील सरतपास विद्वान वकील श्री. ए. जी. करडक यांचेमार्फत शपथेवर सुरू -**</u>

२३. आरोपीने व्यवहारापोटी जो चेक दिला होता तो ए.डी.सी.सी. बॅंकचा रक्कम रूपये ५०,०००/- चा होता. आता मला नि. २२ वरील अनुक्रमांक १२ वरील धनादेश दाखवण्यात आला. तो तोच धनादेश आहे जो अनादरीत झाला होता. वादातील धनादेशाची मुळ प्रत दाखल केल्यामुळे त्यास **नि. २७** देण्यात येते. आरोपीने दिलेला धनादेश मी युनियन बॅंक शाखा सोनई येथे वटविण्याकरीता भरला होता. मला नि. ०३ वरील अनुक्रमांक ६ वर धनादेश भरल्याची पावती आता मला दाखवण्यात आली. ती मुळ पावती असल्यामुळ त्यास **नि. २८** देण्यात येते. धनादेश बॅंकेतून परत आला. त्यावर फंड इनसफीसिंड असा शेरा मारुन परत आला. सदर बाबतीचा मेमो ए.डी.सी. सी. बॅंकेने युनियन बॅंकेला दिला. सदर बाबतीचा मेमो नि.२२ वरील अनुक्रमांक १५ वर दाखल आहे. तो मुळ स्वरूपात असल्यामुळे त्यास **नि. २९** देण्यात येते. त्यानंतर ए.डी.सी.सी. बॅंकेने ज्ञापन म्हणून नि. २२ वरील अनुक्रमांक १४ वर दाखल केलेला आहे. तो मुळ स्वरूपातील असल्यामुळे त्यास **नि. ३०** देण्यात येते. त्यानंतर युनियन बॅंकेने मला मेमो दिला. तो मेमो नि. २२ वरील अनुक्रमांक १३ वर दाखल आहे. सदर मेमो मुळ स्वरूपात असल्यामुळे त्यास **नि. ३१** देण्यात येते.

२४. धनादेश अनादरीत झाल्यामुळे मी आरोपीला वकील श्री. एस.डी. तांबे यांच्यामार्फत दि. ०९/०३/२०२१ रोजी पाठविली होती. सदर नोटीस स्थळ प्रत नि. ३ वर अनुक्रमांक ४ वर दाखल आहे. त्यावर माझी व वकीलांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ३२** देण्यात येते. सदर नोटीस मी पोस्टाने पाठविली होती. ती नोटीस आरोपीला मिळाली नाही. नोटीस मुळ पाकीटासह लेफट ॲडेस या शे-यासह दि. १२/०३/२०२१ रोजी परत आली. नोटीसच्या पाकीटाची मुळ प्रत नि. ०३ अनुक्रमांक ०५ वर दाखल केल्यामुळे नोटीसच्या पाकीटला **नि. ३३** देण्यात येते.

२५. प्रस्तुत केस दाखल करण्याकरीता संस्थेने मला व श्री. अविनाश विनायक बनकर यांना अधिकार दिले होते. त्याचा ठराव मी नि. ०३ अनुक्रमांक ०७ वर दाखल केलेला आहे. ठरावाची मुळ प्रत दाखल केल्यामुळे त्यास **नि. ३४** देण्यात येते. आरोपी व आमच्या संस्थेत करारनामा झाला होता तो करारनामा मी नि. २२ अनुक्रमांक ०२ वर दाखल केलेला आहे. तो करारनामा मला आता दाखवण्यात आला. त्यावर करार लिहून घेणार म्हणून संस्थेचे सचिन अविनश विनायक बनकर आणि करार लिहून देणार म्हणून श्री. रूपेश दिलीप घोरपडे यांची सही आहे तसेच तिन साक्षीदारांच्या सहया आहेत.

२६. नि. २२ वरील अनुक्रमांक ०३ वरील दि. ०१/०९/२०२० रोजीचा कागद मला

दाखावण्यात आला तो कागद रक्कम उचल मागणीचा आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोरब आहे त्यास **नि. ३५** देण्यात येते. नि. २२ वरील अनुक्रमांक ०५ वरील दि. २१/०९/२०२० रोजीचा कागद मला दाखावण्यात आला तो कागद रक्कम उचल मागणीचा आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ३६** देण्यात येते. नि. २२ वरील अनुक्रमांक ०७ वरील दि. २९/१०/२०२० रोजीचा कागद मला दाखावण्यात आला तो कागद रक्कम उचल मागणीचा आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि. ३७** देण्यात येते. नि. २२ वरील अनुक्रमांक ०९ वरील दि. २८/११/२०२० रोजीचा कागद मला दाखावण्यात आला तो कागद रक्कम उचल मागणीचा आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि. ३८** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलटपासाकरीता तहकूब.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**
**स्वाक्षरीत/-**

(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.४, नेवासा.

दिनांक :३०/०१/२०२६
नेवासा.